RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# भारतातील शेतमजुरांच्या समस्या

**प्रा. देवयानी सुधाकर शेटये** समाजशास्त्र विभाग, मेहिनी मुरारी मयेकर कला व वाणिज्य महाविद्यालय चाफे, मेल– amrutan28@gmail.com

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण अर्थव्यवस्थेला खूप महत्त्व आहे. कारण ग्रामीण क्षेत्राचा मुख्य व्यवसाय हा कृषी असून भारताच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. परंतु ज्याप्रमाणे कृषीचा विकासही अनेक घटकांवर अवलंबून आहे, त्यात सर्वात महत्वाचा घटक म्हणजे कृषी श्रमिक/शेतमजूर हा होय.

शेतीमध्ये वेगवेगळया प्रकारचे कार्य हे शेतकरी करतात. परंतु शेतीचे भौगोलिक क्षेत्रफळ जास्त असेल त्यावेळी शेतक.याला इतर व्यक्तींची मदत घेणे आवश्यक असते. त्या व्यक्तीला शेतमजूर असे म्हणतात. त्यांच्याकडे स्वतःची जमीन नसल्यामुळे त्यांना भूमिहीन शेतमजूर असेही म्हणतात. शेतीच्या विकासात शेतमजूरांचा विचार न करता इतर घटकांचे विवेचन करणे म्हणजे शेतमजुरांवर अन्याय करणे होय. यासाठी शेतमजूर भूमिहीन श्रमिक यांचा अभ्यास महत्वाचा वाटतो.

**संशोधणाची उद्दीष्टये :**

1. भारतातील शेतमजुरांचे समस्याचे अध्ययन करणे.
2. भारतातील शेतमजुरांच्या हालाखीची परिस्थितीची कारणे अभ्यासणे.
3. शेतमजुरांच्या समस्यावरील उपाययोजनाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :** दुय्यम स्त्रोत :

**संशोधन माहितीचे विश्लेषण :**

शेती फार पुरातन काळापासून चालत आलेली आहे. आपले पूर्वज (आदिमानव) यांच्या युक्तीतून व विचारातून ही संकल्पनेचा उगम झाला. दिवाळीच्या सणाला घरात शेतकऱ्यासाठी (बळीराजा) प्रार्थना केली जायची. 'इडा पीडा टळो आणि बळीचं राज्य येवो' परंतु ही शेती करताना त्यांना कीती संकटाना सामना करावा लागतो याचा विचार केला जात नाही. भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेमध्ये सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती प्रतिकुल असलेल्या गरीब भूमिहीन शेतमजुरांचे प्रमाण असंघटीत क्षेत्रामध्ये अधिक असल्याचे दिसून येते.

**शेतमजुराची व्याख्या :**

निरनिराळया शेतकी कार्यासाठी ज्यांची श्रमशक्ती कायमची किंवा तात्पुरत्या काळापुरती मजुरीवर कामासाठी घेतली जाते अशा व्यक्तीचा वर्ग म्हणजे शेतमजुराचा वर्ग होय.

ज्या व्यक्ती शेतीमध्ये वर्षभर मजुरीने काम करण्यासाठी तयार असतात आणि प्राप्त होणाऱ्या मजुरीव्दारे कुटुंबाचा उदनिर्वाह करतात. काम नसल्यामुळे वेळप्रसंगी बेरोजगार राहावे लागते अशा व्यक्तीला शेतमजूर म्हणतात.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**भारतातील शेतमजुरांची स्थिती :**

भारतातील निरनिराळया घटक राज्यातील शेतमजुरांची स्थिती भिन्न असली तरी एकंदरीत पाहता भारतातील सर्वच शेतमजुरांची स्थिती औद्योगिक कामगारांच्या स्थितीपेक्षक बऱ्याच कमी प्रतिची आहे. एवढेच नव्हे तर अत्यंत कष्टमय आहे.

भूमिहीन शेतमजुरांकडे श्रमाच्या व्यतिरिक्त कोठल्याही उत्पन्नाच्या साधनांची मालकी नसून त्यांना अनेक समस्यांना सामना करावा लागतो. विविध अभ्यासकांनी भूमिहीन शेतमजुरांचे परिस्थिती संदर्भात मते मांडली आहे. त्यांच्या मते 93.33 टक्के भूमिहीन शेतमजुरांना हंगामी स्वरूपाचे काम मिळत असल्याचे तर 88.33 टक्के भूमिहीन शेतमजुरांना असमान मजूूरी मिळत असल्याचे आणि 76.67 टक्के शेतमजुरांना अनियमित अल्परोजगार मिळत असल्याचे दिसून आले.

तसेच महाराष्ट्रातील अनुसुचित जातीमध्ये 74.22 टक्के भूमिहीन शेतमजुरांचे प्रमाण तर अनुसुचित जमातीमध्ये सुद्धा 74.22 टक्के व इतर मागासवर्गामध्ये 61.90 टक्के भूमिहीन शेतमजुराचे प्रमाण आढळले. आज देशाच्या एकूण श्रमशक्तीपैकी $^{2}/_{3}$ शेतमजूर प्रामुख्याने असंघटीत क्षेत्रामध्ये असल्याचे आढळले. शेतक.यांना पर्यायी रोजगार संधीचा अभावामुळे शेतमजुरांची स्थिती खूपच हालाखीची दिसून आली.

**शेतमजुरांच्या समस्या/सामाजिक व आर्थिक हालाखीची कारणे :**

1. **हीन सामाजिक दर्जा :**

बहुतेक पददलित, अनुसूचित जातीतील व जमातीतील लोक शेतमजुरांच्या गटात मोडतात. शेतमजुरांना प्राप्त झालेला सामाजिक दर्जा हीन असल्याने, ते दारिद्रयाने पछाडलेले असल्याने आणि संघटित नसल्याने त्यांची पिळवणूक करणे खेड्यातील जमीनमालकांना सहज शक्य असते.

स्वातंत्र्योत्तर काळात विशिष्ट कायदे केले जात असल्याने भारतातील शेतमजुरांची स्थिती अंशतः सुधारित झाली तरी त्यांच्या स्थितीत अद्याप म्हणण्याजोगी सुधारणा झालेली नाही.

2. **शेतमजुरांचे असंघटित स्वरूप :**

शेतमजूर अशिक्षित, अज्ञानी असून ते खेड्यापाड्यात विखुरलेले आहेत. त्यामुळे त्यांची संघटना बांधणे कठीण आहे अपार दारिद्र्य, जातीसंस्थेचा पगडा, भांडणतंटे, व पक्षगट, धडाडीचा अभाव इत्यादी कारणामुळे संकुचित वृत्तीचा प्राणी समजला जातो. एकीचे बळ हे तत्व शेतमजुरांना न समजल्याने समाजाकडून त्यांची उपेक्षा केली जाते.

3. **रोजगाराचे हंगामी स्वरूप :**

शेतमजुरांना सातत्याने काम मिळत नाही. वर्षातून 4 ते 6 महिने रोजगार उपलब्ध होतो. वर्षाच्या उर्वरीत काळात जवळजवळ ते बेकार असतात तसेच पर्यायी रोजगार मिळतोच असे नाही.

भारतातील काही भागात शेतीव्यवसायाचे अधिकाधिक यांत्रिकीकरण केले जात असल्याने प्रत्यक्षात शेतमजुरांची बेकारी व न्यून, रोजगार यामध्ये वाढ होत आहे.

4. **वाढते किंमतमान :**

पूर्वी शेतमजुरांना वस्तुंच्या स्वरूपात मजुरी दिली जाई तेथेही वस्तूंच्या स्वरूपात मजुरी देण्याची पद्धती बंद करून जमीनमालक पैशाच्या स्वरूपात मजुरी देवू लागले आहेत पण पैशाचे मूल्य अलिकडील काळात फार मोठ्या प्रमाणात घटू लागल्याने केवळ जीवनावश्यक वस्तू खरेदी करणेही शेतकऱ्यांना दुरापास्त झाले आहे.

5. **बिगर, शेतकी रोजगाराचा अपूरेपणा :**

बहुतेक खेड्यात अद्याप शेती हाच बहुसंख्य प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे शेतमजुरांना पर्यायी रोजगार उपलब्ध होणे कठीण होते. त्यामुळे कमी वेतनावर समाधान मानून खालावलेली आर्थिक स्थिती

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

स्विकारावी लागते तसेच शेतमजुरांमध्ये गतीमानतेचा अभाव असल्याने आपले गाव सोडून अन्य घटक राज्यांत जाण्यास ते सहसा तयार नसतात.

6. **शेतमजुरांचा कर्जबाजारीपण :**

शेतमजुरांचे आणि विशेषतः भूमिहीन शेतमजुरांचे उत्पन्न आवश्यक गरजा भागविण्याच्या दृष्टिनेही पुरेसे नसल्याने हे शेतमजूर ज्या जमिनमालकाच्या जमीनीवर काम करतात त्याच जमीनमालकाकडून बऱ्याचवेळा कर्ज घेतात. कामाच्या उपलब्धतेनुसार मजुरीव्दारे उत्पन्न प्राप्त होत नाही व कर्जाची परतफेड करता येत नाही. त्यामुळे शेतमजूरांत कर्जबाजारीपणा दिसून येतो.

7. **वेठबिगारी पद्धत :**

शेतमजुराने सावकाराकडून घेतलेले कर्ज वेळेवर परतफेड न झाल्यास गावातील सावकार शेतमजुरास बिगारीने ठेवतात. त्यालाच वेठबिगारी असे म्हणतात. भारतीय संविधानातील तरतुदीनुसार वेठबिगारी बंद केली आहे. प्रत्यक्षात मात्र चालू असल्याचे आढलते या वेठबिगारी पद्धतीमुळे शेतमजुरांचे आर्थिक शोषण होते.

8. **मजुरीचा भिन्न दर :**

शेतमजुराच्या कुटुंबात असलेले इतर पुरूष आणि महिला हे सर्व शेतावर शेतमजुरीचे कार्य करीत असतील तर त्यांना प्राप्त होणारे वेतन भिन्न असल्याचे दिसते. पुरूष शेतमजुराच्या तुलनेत स्त्री मजुरांना मिळणारे वेतन 30–50 टक्के कमी असते.

9. **समाजिक प्रतिष्ठेचा अभाव :**

शेतमजुरांचे अज्ञान, दारिद्र्य, निरक्षरता व अल्प मजुरीदर इ.मुळे शेतमजुरांना सामाजिक प्रतिष्ठा आढळून येत नाही. त्यामुळे त्यांना आर्थिक मदत करण्यास कोणी तयार होत नाही.

10. **जमिनमालकाचा विरोध :**

शेतमजूर असंघटित, निरक्षर व अज्ञानी असल्याने मध्यस्थ, सावकार आणि जमिनदार त्यांची पिळवणूक करतात. शेतमजुरांचे हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न शेतकऱ्याकडून केला जात नाही. शेतमजुरांच्या मजुरीमध्ये वाढ होवू नये यासाठी जमीनमालक प्रयत्न करतात. त्यामुळे शेतमजुरांचे कामाचे तास, कामाचा कालावधी विचारात न घेता त्यांना प्राप्त होणारे उत्पन्न खूप कमी असते.

11. **सरकारची उदासीन प्रवृत्ती :**

स्वातंत्र्यपूर्व काळात शेतमजुरांच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष झाले असले तरी स्वातंत्र्योत्तर काळात शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले परंतु कायद्यातील तरतुदीची योग्य अमलबजावणी करण्यात आली नाही. कारण सहकार मध्ये सहभागी होणारे प्रतिनिधी यांच्या शेतावर शेतमजूर कार्य करत असतात. त्यामुळे सरकारची आणि सरकारमध्ये सामील झालेल्या लोकप्रतिनिधीची शेतमजुरांच्या संदर्भातील उदासीन प्रवृत्ती शेतमजुराच्या सामाजिक दर्जा कनिष्ठ राहण्यास कारणीभूत आहेत. याशिवाय निरक्षरता आणि अज्ञान, कुटुंबातील सदस्यांची संख्या, ग्रामीण उद्योगांचा ऱ्हास, शेतमजुरांची संख्यात्मक वाढ, भटकी प्रवृत्ती अशा कारणामुळे अनेक समस्यांना भारतातील शेतमजूर बळी पडत आहे.

**शेतमजूरासाठी शासनाने केलेल्या उपाययोजना :**

1. भारतीय घटना : वेठबिगारी नष्ट
2. किमान वेतन कायदा : 1948
3. इतर कायदे : जमीनदारी पद्धत नष्टए कुळकायदे कमाल धारण कायदे इ.
4. मजुरांची सहकारी संस्था :
5. रोजगार हमी योजना :
6. 20 कलमी कार्यक्रम :
    1. अतिरिक्त जमिनीचे वितरण :

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

2. घरासाठी जागा, मालकी हक्क
3. वेठबिगारी नष्ट
4. ग्रामीण कर्जे रद्द

राज्यशासनाने अशा विविध प्रकारच्या योजनाची अंमलबजावणी केली आहे.

**शेतमजुराची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना :**

शेतावर काम करणाऱ्या शेतमजुरांच्या स्थितीचाविचार करता त्यांची सामजिक व आर्थिक स्थिती सुधारणे अत्यंक आवश्यक आहे. शेतमजुरासाठी सरकारने वेगवेगळे कायदे केले असले तरी त्यांची अंमलबजावणी केल्याचे आढळून येत नाही. यासाठी शासनाने पुढील गोष्टीवर भर देणे आवश्यक आहे.

1. **कुटीरोद्यागांचा विकास :**

ग्रामीण भागात शेतमजुरांना पूर्ण रोजगार उपलब्ध होत नसल्याने त्यांना पूर्णवेळ रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामीण भागात लघु व कुटीर उद्योगांना सरकारने चालना दिली पाहिजे.

2. **आर्थिक मदत :**

ग्रामीण भागात शेतमजूरांना रस्ते बांधणे, तलाव खोदणे, तलावाची दुरूस्ती इ. कामे उपलब्ध करून देऊन त्यांना आर्थिक मदत होईल या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. बेरोजगारी कालावधीत शेतमजुरांना सरकारी कामामध्ये सामाविष्ट करून घेतण्यास त्यांचा जीवननिर्वाह सुव्यवस्थित होईल.

3. **शेतमजुरांचा जीवनविमा :**

शेतमजुरांवर अवलंबून असणा.या सदस्यांची संख्या जास्त असल्यामुळे आणि सरासरी उत्पन्न कमी असल्यामुळे निश्चित  उत्पन्नात त्यांचा जीवननिर्वाह होत नाही. शेतमजुरांच्या कुटुंबावर संकट आल्यास शेतमजुराच्या कुटुंबाची वाताहत होते. ही वाताहत होऊ नये म्हणून शेतमजुराच्या जीवनाचा विमा काढण्यात यावा. म्हणजे एखाद्या कटू प्रसंगी जीवनविम्याच्या पैशातून  त्या कुटुंबास आधार उपलब्ध होईल.

4. **किमान मजुरी कायदा :**

केंद्र सरकारने 1948 मध्ये किमान मजुरी कायदा मंजुर केला  परंतु या कायद्यातील तरतुदीचे पालन होत नसल्याचे आढळून आले. शासनाने याकडे लक्ष द्यावे.

5. **शेतमजुराचे कामाचे तास निश्चित करणे :**

भारतीय कारखाना कायद्यानुसार औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामाचे तास निश्चित करण्यात आले आहेत. त्यापेक्षा जास्त काम केल्यास अतिरिक्त मोबदला दिला जातो. शेतमजुराचे तास निश्चित करण्यात आलेले नसल्याने शेतमालक त्यांना 24 तास राबवून घेतात. म्हणून सरकारने त्यांचे कामाचे तास निश्चित करून दिले पाहिजेत.

6. **कायद्याची प्रभावी अंमलबजावणी :**

शेतमजुरांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात वेगवेगळे कायदे  मंजूर करण्यात आले आहेत. परंतु मंजुर केलेल्या कायद्याची अंमलबजावणी परीणामकारक होत नाही. यासाठी सरकारने कायद्याची स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

7. **तांत्रिक शिक्षण :**

शेतमजुराचे काम कष्टाचे आहे. त्यात तांत्रिक कौशल्य आढळून येत नाही. शेतमजुरांना तांत्रिक शिक्षण दिल्यास औद्योगिक क्षेत्रात  त्यांना रोजगार उपलब्ध होईल.

8. **शेतमजूर संघटना :**

असंघटितपणामुळे त्यांना न्याय्य हक्क प्राप्त होत नाहीत त्यासाठी त्यांची संघटना स्थापन होणे आवश्यक आहे.

9. **कर्जपुरवठ्यासाठी सहकारी संस्था :**

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

शेतमजुरांची सावकाराच्या कचाट्यातून मुक्तता होण्यासाठी सरकारने स्वतः किंवा सहकारी संस्थाच्या माध्यमातून शेतमजुरांना अल्पदराने पतपुरवठा करावा.

**10. औद्योगिक विकास :**

औद्योगिक क्षेत्राचा विकास झाल्यास शेतमजुरांना पर्यायी रोजगार उपलब्ध होईल व बेरोजगारी व अर्धबेरोजगारीची समस्या सुटण्यास मदत होईल.

घरबांधणीसाठी मोफत जमीन, रोजगार सेवा केंद्र, सरकारी कामाचे वाटप, शेतीमध्ये सुधारणा, शेतमजुरांच्या सहकारी संस्था, सुट्ट्यांची सोय , भूदान चळवळ, लघुउद्योगांना प्रोत्साहन इत्यादी बाबतीत सुधारणा करणे आवश्यक आहे.

**समारोप :**

कोणत्याही देशाचा विकास त्या देशाच्या असलेल्या रोजगारांच्या संधीवर अवलंबुन असतो. देशातील 65 टक्के पेक्षाही अधिक लोकसंख्या आजही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे आजच्या घडीला शेती क्षेत्रामध्ये शेतमजुरांची संख्या भूमिहीन शेतमजूर,सिमांत शेतक.यांची संख्या अधिक असून त्यांना बेरोजगारी,अर्धबेकारी,दारिद्र्या अशा समस्या प्रामुख्याने भेडसावत आहे. या शेतमजुरांची स्थिती सुधारण्यासाठी सरकारने किमान मजुरी अधिनियमाची प्रभावीपणे अमलबजावणी करावी.

वेठबिगार शेतमजुराचे निर्मुलन करावे, पर्यायी रोजगार उपलब्ध करावा. असे केल्यास या शेतमजुरीचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

**संदर्भ सुची :**

1- श्रीधर देशपांडे , विनायक देशपांडे : भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) पृष्ठ क्र. 224, 225, 226
2- कै. डॉ. स. श्री. मु. देसाई. डॉ. सौ. निर्मल भालेराव भारतीय अर्थव्यवस्था पृष्ठ क्र. 251, 252, 253, 254, 255
3- डॉ.गंगाधर वि. कायंदे–पाटील शेतीचे अर्थशास्त्र– सिदधान्त आणि धोरण पृष्ठ क्र. 12.1 ते 12.10
4- अर्थसंवाद –खंड 39
5- ग्रामीण अर्थव्यवस्था
6- https://googleweblight.com
7- www.wikipedia.org